**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : जालिंदर प्रकाश राहणे ,
वय : ३८ वर्षे,
पद : पोलीस हवालदार, घोडेगाव पोलीस स्टेशन.
राहणार : घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. घटनेच्यावेळी माझी नेमणुक पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन घोडेगाव पोलीस स्टेशन येथे होती. दि.१८/१०/२०२१ रोजी दुपारी १.२० मिनिटांनी मी व पोलीस हवालदार लायगुडे, पोलीस कॉन्स्टेबल ढेंगळे, होमगार्ड लेंबे असे सरकारी वाहनाने जुन्नर फाटा येथे पेट्रोलिंग करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी आम्हाला घोडेगाव पोलीस स्टेशन समोरील जनता विद्यालय येथे बोलावुन घेतले. जनता विद्यालयाच्या संरक्षण भिंतीवर असलेल्या फ्लेक्सवर मजकुर लिहिला होता. त्याबाबत आम्हाला माने साहेबांनी सदर फ्लेक्स लावण्याकरीता ग्रामसेवकाने परवानगी दिली आहे का हे पाहण्यास सांगितले. तसेच सदरचे फ्लेक्स पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अनेक ठिकाणी लावल्याचे आढळुन आल्याने त्याबाबत चौकशी करण्यास सांगितले.

२. सदर फ्लेक्सबाबत आम्ही ग्रामसेवक घोडेगाव यांच्याकडे चौकशी केली. चिंचोली कोकणे येथे असलेल्या चौकामध्ये लावलेल्या फ्लेक्स संदर्भात आम्ही चौकशी केली. सदर फ्लेक्स वर कुंदन काळे यांचे नाव होते व " जिवित शरदम शतम शुभेच्छुक सौरभ कोकणे व कुंदन भाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता. त्यानंतर पुढे आम्ही गिरवली बस स्टॉप येथे गेलो असता तेथे एक फ्लेक्स लावलेला होता. त्यावर कुंदन भाऊ काळे शुभेच्छुक धर्मराज ग्रुप व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार असे लिहिलेले होते. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता. त्यानंतर आम्ही पिंपळगाव घोडे येथे गेलो असता तेथे चौकामध्ये लावलेल्या फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा

फोटो वर त्यावर चोहीकडे गर्जतो माझा शुभेच्छुक अमितभाऊ ढमढेरे व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता.

३. त्यानंतर आम्ही शिनोली चौकामध्ये गेलो असता तेथे लावलेल्या फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा फोटो वर त्यावर शिवराज्य ग्रुप व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार कानसे " असा मजकुर लिहिला होता. त्यानंतर आम्ही डिंभे येथील चौकामध्ये गेलो असता तेथे लावलेल्या फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा फोटो शुभेच्छुक डिंभे बॉईज व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. अशा विविध सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या फ्लेक्स बाबत ग्रामसेवकांबाबत चौकशी केली असता फ्लेक्स लावण्याकरीता कोणतीही परवानगी न घेतल्याचे आढळुन आले. त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल ढेंगळे यांनी इसम कुंदन काळे यांच्याविरुध्द घोडेगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. आरोपीचा गैजहजेरी माफीचा अर्ज अभिलेखावर दाखल आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. आय. सी. शेख यांच्यामार्फत</u>**

४. मी घोडेगाव पोलीस स्टेशन येथे पाच वर्षापासुन कार्यरत आहे. मी घोडेगाव पोलीस स्टेशन येथे पाच वर्षापासुन कार्यरत असल्याने मला घोडेगाव हद्दीतील सर्व ठिकाणांची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घोडेगाव पोलीस स्टेशनमधील दुस-या मजल्यावरुन जनता विद्यालय दिसते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा दत्त जयंती यात्रे निमित्त महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा भरवतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्पर्धा आरोपी भरवत असल्याने घोडेगावमध्ये त्याचे अनेक कार्यकर्ते आहेत. आम्ही ज्या वाहनाने पेट्रोलिंग करीता गेलो होतो त्या वाहनाचा नंबर एम.एच.१२ ई.एच.२८८८ असा होता. सदर वाहनाची नोंद स्टेशन डायरीला केली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आरोपीचा वाढदिवस किती तारखेला होता हे मला सांगता येणार नाही. फ्लेक्सबाबत घोडेगाव मधील ज्या ग्रामसेवकाकडे चौकशी केली त्याचे नाव मला सांगता येणार नाही. मी जबाब देतेवेळी शिनोली चौकात फ्लेक्स

लावला होता असे सांगितले होते. जबाबामध्ये शिनोली बस स्टॉप जवळ फ्लेक्स लावला असे नमुद आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, शिनोली चौकातच बस स्टॉप आहे. घोडेगाव हद्दीत ६ फ्लेक्स लावले होते. सदर फ्लेक्सची लांबी - रुंदी मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर फ्लेक्स हे कुंदन काळे यांच्या कार्यकत्यांनी लावले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर फ्लेक्स हे आरोपीने लावले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आमदार महेश लांडगे यांच्या आंबेगाव तालुका स्पोर्ट्स फाउंडेशनचे काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी स्पोटर्स फाउंडेशन अंतर्गत वेगवेगळ्या स्पर्धा घेतो व त्याचे फ्लेक्स लावतो. पंच फारुक सय्यद हा घोडेगाव हद्दीतील रहिवासी असुन त्याचे पोलीस स्टेशनला येणे जाणे असते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे पंच दिपक विष्णु पारधी हे होमगार्ड आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८/१०/२०२१ रोजी दुपारी १.२० मिनिटांनी मी व पोलीस हवालदार लायगुडे, पोलीस कॉन्स्टेबल ढेंगळे, होमगार्ड लेंबे असे सरकारी वाहनाने जुन्नर फाटा येथे पेट्रोलिंग करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी आम्हाला घोडेगाव पोलीस स्टेशन समोरील जनता विद्यालय येथे बोलावुन घेतले. जनता विद्यालयाच्या संरक्षण भिंतीवर असलेल्या फ्लेक्सवर मजकुर लिहिला होता. त्याबाबत आम्हाला माने साहेबांनी सदर फ्लेक्स लावण्याकरीता ग्रामसेवकाने परवानगी दिली आहे का हे पाहण्यास सांगितले. तसेच सदरचे फ्लेक्स पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अनेक ठिकाणी लावल्याचे आढळुन आल्याने त्याबाबत चौकशी करण्यास सांगितले हे मी खोटे सांगत आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, सदर फ्लेक्सबाबत आम्ही ग्रामसेवक घोडेगाव यांच्याकडे चौकशी केली. चिंचोली कोकणे येथे असलेल्या चौकामध्ये लावलेल्या फ्लेक्स संदर्भात आम्ही चौकशी केली. सदर फ्लेक्स वर कुंदन काळे यांचे नाव होते व " जिवित शरदम शतम शुभेच्छुक सौरभ कोकणे व कुंदन भाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता. त्यानंतर पुढे आम्ही गिरवली बस स्टॉप येथे गेलो असता तेथे एक फ्लेक्स लावलेला होता. त्यावर कुंदन भाऊ काळे शुभेच्छुक धर्मराज ग्रुप व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार असे लिहिलेले होते. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता. त्यानंतर आम्ही पिंपळगाव घोडे येथे गेलो असता तेथे चौकामध्ये लावलेल्या

फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा फोटो वर त्यावर चोहीकडे गर्जतो माझा शुभेच्छुक अमितभाऊ ढमढेरे व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. सदरचा फ्लेक्स वेदांन डिजिटल यांनी तयार केला होता हे मी खोटे सांगत आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही शिनोली चौकामध्ये गेलो असता तेथे लावलेल्या फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा फोटो वर त्यावर शिवराज्य ग्रुप व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार कानसे " असा मजकुर लिहिला होता. त्यानंतर आम्ही डिंभे येथील चौकामध्ये गेलो असता तेथे लावलेल्या फ्लेक्सवर " कुंदनभाऊ काळे यांचा फोटो शुभेच्छुक डिंभे बॉईज व कुंदनभाऊ काळे मित्र परीवार " असा मजकुर लिहिला होता. अशा विविध सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या फ्लेक्स बाबत ग्रामसेवकांबाबत चौकशी केली असता फ्लेक्स लावण्याकरीता कोणतीही परवानगी न घेतल्याचे आढळुन आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०६/०५/२०२६**
**घोडेगाव**